महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

बीड । महाराष्ट्र
शुक्रवार दि.१३ फेब्रुवारी २०२६
वर्ष ५ वे । अंक ३१३
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955
E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

। RNI/MAHMAR/2021/80074 । Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 । https://marathwadapatra.com । https://epaper.marathwadapatra.com










## अजितदादांच्या स्वप्नातील

# बीड घडवण्यासाठी कटिबद्ध

बीड । प्रतिनिधी

बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात आज जिल्ह्याच्या नवनियुक्त पालकमंत्री आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न झाली. अजित पवार यांच्या निधनानंतर झालेली ही पहिलीच बैठक भावूक वातावरणात पार पडली. बैठकीच्या सुरुवातीला दिवंगत अजित पवार यांनी बीड जिल्ह्याच्या विकासासाठी दिलेल्या योगदानाचा आढावा घेणारी एक चित्रफीत दाखवण्यात आली. यावेळी माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी शोक प्रस्ताव मांडला.



पिंपरी-चिंचवड आणि बारामती प्रमाणे बीड जिल्ह्याचा कायापालट व्हावा, हे दादांचे स्वप्न होते, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. अजितदादांना बीड जिल्ह्याविषयी प्रचंड ओढ होती. त्यांचे जे अपूर्ण स्वप्न आहे, ते पूर्ण करण्यासाठी सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी एकदिलाने आणि प्रामाणिकपणे काम करावे. विकासाची गंगा तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. असेही सुनेत्रा पवार यावेळी म्हणाल्या. जिल्ह्याच्या विकासकामांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असे आश्वासन देताना त्यांनी तांत्रिक बाबींची माहिती दिली. जिल्ह्याचा एकूण विकास आराखडा ५८५ कोटी रुपयांचा आहे. त्यापैकी ४८१ कोटी रुपयांचा निधी जिल्ह्याला प्राप्त झाला. प्राप्त झालेला निधी विहित कालावधीत आणि गुणवत्तेसह खर्च करण्याच्या सूचना सुनेत्रा पवार यांनी दिल्या. या बैठकीस ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे, खासदार बजरंग सोनवणे, आमदार प्रकाश सोळंके, आमदार नमिता मुंदडा, आमदार सुरेश धस उपस्थित होते. तर सभागृहात निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाणे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव आणि विविध विभागांचे जिल्हाप्रमुख उपस्थित होते.

## धनंजय मुंडेंची भावनिक साद



उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा नियोजन समितीची पहिली बैठक पार पडली. स्वर्गीय अजित पवार यांच्या निधनानंतर जिल्हा नियोजन समितीची ही पहिलीच बैठक असल्याने वातावरण भावनिक होते. यावेळी धनंजय मुंडे यांनी स्व. अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडल्यानंतर उपस्थितांना उद्देशून ही भावनिक साद दिली.

## नेकनूर पोलिसांच्या कारवाईत पावणे तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

# सिमेंटच्या गोणीतून गांज्याची तस्करी

नेकनूर । प्रतिनिधी

जिल्ह्यात अवैध धंद्यांवर कारवायांचे सत्र सुरु असताना नेकनूर पोलिसांनी गांज्याची तस्करीचे रॅकेट उघडकीस केले आहे.सिमेंटच्या गोणीतून गांज्याची तस्करी करण्यात येत असल्याची माहिती मिळाल्यावरून सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांनी एका शेतात छापा मारून याचा फर्दाफ़ाश केला.या कारवाईत ११ किलो १५० ग्रॅम गांजा ज्याची किंमत २ लाख ७८ हजार ७५० रुपयांच्या घरात असल्याची माहिती आहे.नेकनूर

### दोघे ताब्यात

पोलिसांनी ावेळी दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल केले. नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हिंगणी बुद्रुक गावात एका उसाच्या शेतात सिमेंटच्या गोणीत गांज्या भरून ठेवण्यात आलाहोता. याची माहिती नेकनूर पोलिसांना झाल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी व त्यांच्या ▶▶पान २ वर

## स्व.अजितदादांचे बीड शहरात भव्य स्मारक उभारणीसाठी

# मुख्यमंत्र्यांकडून हिरवा कंदिल

बीड । प्रतिनिधी

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनांचा प्रारुप आराखडा अंतिम करण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय नियोजन बैठक संपन्न झाली. बीड जिल्हाधिकारी कार्यालयातून दृकश्राव्य प्रणालीद्वारे आ. विजयसिंह पंडित यांनी या बैठकीत सहभागी होत बीड नगर परिषद हद्दीत दिवंगत स्व.अजितदादा पवार यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करण्याची मागणी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिशय सकारात्मक पध्दतीने त्यास मान्यता देऊन हिरवा कंदिल दाखविला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दि.१२ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता सन



### नियोजन बैठकीत आ.विजयसिंह पंडित यांची मागणी

२०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनांचा प्रारुप आराखडा अंतिम करण्यासाठी राज्यस्तरीय नियोजन समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. दृकश्राव्य प्रणालीच्या माध्यमातून गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ. विजयसिंह पंडित बीड जिल्हाधिकारी कार्यालयातून या बैठकीत सहभागी झाले. स्व.अजितदादा पवार यांनी बीड जिल्ह्याचे पालकत्व स्विकारल्यानंतर त्यांनी बीड जिल्ह्यात अनेक विकास कामांची सुरुवात केली. अनेक विकास योजना ▶▶पान २ वर

## संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह बांधकामासाठी निधीसह मंजूरी

# ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी स्वतंत्र,हक्काचे वसतीगृह होणार

बीड । प्रतिनिधी

ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी वसतीगृह होणार हा निर्णय संपुर्ण बीड जिल्ह्यासाठी ऐतिहासिक झाला आहे. संत भगवानबाबा शासकीय वसतीगृहाच्या बांधकामासाठी शासनाकडून भरघोस निधीसह मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे आ.संदिप क्षीरसागर यांनी दिवंगत नेते स्व.अजितदादा पवार तसेच महाराष्ट्र शासनाचे आभार मानले आहेत. मागील मोठ्या कालावधीपासून बीड विधानसभा मतदारसंघाचा आमदार या नात्याने बीड जिल्ह्यातील स्थलांतरीत ऊसतोड कामगारांची मोठी संख्या लक्षात घेवून त्यांच्या मुला-मुलींसाठी स्वतंत्र, सुरक्षित आणि हक्काचे शासकीय वसतीगृह उभारण्यात यावे या करीता आ.संदिप क्षीरसागरांचा पाठपुरावा सुरू होता. संत भगवानबाबा शासकीय वसतीगृह योजना प्रभावीपणे राबवून ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणाची संधी मिळावी. या करीता दुरदृष्टी असलेले दिवंगत नेते स्व.अजितदादा पवार यांनी सकारात्मक भुमीका घेत आवश्यक निधी उपलब्ध ▶▶पान २ वर



# ट्रॅक्टर पलटी होऊन २८ वर्षीय तरुणाचा मृत्यु

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील हिवरा (बु.) येथे ट्रॅक्टर पलटी होऊन झालेल्या अपघातात २८ वर्षीय शेतमजूर तरुणाचा मृत्यु झाल्याची घटना गुरुवारी (दि.१२) पहाटे घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. गणेश भारत गाडे (वय २८) रा.हिवरा बु. ता.माजलगाव हे शेतमजुरीचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. गुरुवारी पहाटे सुमारे २ च्या सुमारास ते शेतातील कामासाठी ट्रॅक्टर घेऊन जात असताना शेतातील वळण रस्त्यावर ट्रॅक्टर वळविताना वाहनाचा तोल जाऊन ट्रॅक्टर पलटी झाले. या अपघातात ट्रॅक्टर त्यांच्या अंगावर पडल्याने त्यांचा जागीच मृत्यु झाल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन त्यांना उपचारासाठी रुग्णालयात हलविले; मात्र, डॉक्टरांनी ▶▶पान २ वर

## संपादकीय

# महाराष्ट्राला लॉटरी



मुंबई, पुणे आणि नागपूर ही महाराष्ट्राची महत्त्वाची शहरे आणि येथेच सर्वाधिक प्रकल्प येत आहेत. त्यामुळे या केंद्रांना आर्थिक मदत दरवर्षी म्हणजे या केंद्रांची उर्जितावस्था आणून महाराष्ट्राला आणखी उंचीवर नेऊन ठेवण्यासारखे आहे. केंद्रीय अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला कर विनियोजनातून राज्याला ९८ हजार ३०६ कोटी रुपये मिळतील असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले, हे यासाठी महत्त्वाचे आहे. कारण आदित्य ठाकरे आणि विरोधी पक्षांनी केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला काहीच मिळाले नाही असे रडगाणे लावले. त्याला उत्तर म्हणून फडणवीस यांचे विधान आणि संबंधित आकडेवारी महत्त्वाची आहे. ही रक्कम २०२५–२६ च्या अर्थसंकल्पातून मिळणाऱ्या रकमेपेक्षा २० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. तरीही आदित्य ठाकरे म्हणतात त्यामागे केवळ भाजपचा द्वेष आणि स्वतःला सत्ता मिळाली नाही ही खंत आहे, दुसरे काही नाही. महाराष्ट्राला इतकेच नव्हे, तर पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये जे १२.२ लाख कोटी रुपये गुंतवले जाणार आहेत त्यामध्येही महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. मुंबई, पुणे आणि नागपूर येथील प्रस्तावित विकासकेंद्रांना पुढील पाच वर्षांत ५ हजार कोटी रुपये मिळणार. मुंबई, पुणे आणि नागपूर हे महाराष्ट्राची महत्त्वाची शहरे आणि येथेच सर्वाधिक आस्थापना आणि विविध प्रकल्प येत आहेत. त्यामुळे या केंद्रांना आर्थिक मदत दरवर्षी म्हणजे या केंद्रांची उर्जितावस्था आणून महाराष्ट्राला आणखी उंचीवर नेऊन ठेवण्यासारखे आहे. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस किंवा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जे म्हणतात महाराष्ट्राला खूप काही दिले आहे हे सत्य आहे. फडणवीस यानी सांगितले त्याप्रमाणे मुंबई, पुणे आणि हैदराबाद या हायस्पीड कॉरिडॉरमुळे महाराष्ट्राच्या विकासाला तर चालना मिळेलच, पण मराठवाडा आणि इतर जे मागास भाग आहेत त्यांच्या विकासाला हातभार लागणार आहे. हायस्पीड रेल्वेमुळे १७० किमीचा प्रवास अवघ्या ४८ मिनिटांत पूर्ण होणार. काँग्रेस नेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी अर्थसंकल्पावर टीका करताना म्हटले, की सुधारणांपेक्षा देखाव्याला प्राधान्य दिले. पण विरोधक म्हणून त्यांची टीकेत काही तथ्य नाही. कारण केंद्राने महाराष्ट्राला आणि देशाला भरपूर काही दिले. महाराष्ट्राला केवळ हायस्पीड रेल्वेच नव्हे, तर अर्थसंकल्पीय तरतुदीमुळेही लाभ होणार आहे. त्यातून महाराष्ट्राचा विकास साध्य होईल. उदाहरणार्थ ग्रामीण रस्त्यांसाठी ३७८ कोटी रुपये मिळणार आहेत, तर इकॉनॉमिक क्लस्टरसाठी २८३ कोटी रुपये आणि पाटबंधारे कामांसाठी २०७ कोटी रुपये. नियोजित शहरीकरण आणि उद्योग तसेच उद्योजकतेला प्राधान्य या द्वारे हा अर्थसंकल्प राज्याच्या शाश्वत विकासासाठी पाया मजबूत करत आहे. विरोधी पक्षांनी राज्याला या अर्थसंकल्पातून काय मिळाले असा सवाल केला. पण त्यांच्या माहितीसाठी ही आकडेवारी सांगणे आवश्यक आहे, की ९८ हजार ३०६ कोटी रुपये मिळाले. यातून महाराष्ट्राची वाटचाल आणखी गतिमान होईल यात शंका नाही. विकसित भारत बनवण्याचे जे पंतप्रधान मोदी यांचे लक्ष्य आहे त्या दिशेने जाणारा हा अर्थसंकल्प भक्कम आहे. उद्योगांना प्रोत्साहन आणि गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती यांना अर्थसंकल्पात देण्यात आलेले महत्त्व हे शाश्वत वाढीसाठी ठोस पाया आहे. पायाभूत क्षेत्रासाठी १२ लाख कोटी रुपयांची तरतूद ही महाराष्ट्राला मिळालेली भेट. त्याशिवाय कृषी, मत्स्य उत्पादनासाठी ५०० तलाव आणि पशुसंवर्धन यासाठी भरीव तरतुदी यामुळे ग्रामीण महाराष्ट्राचे चित्र नक्कीच पालटेल. एकूण महाराष्ट्राला या अर्थसंकल्पातून एक लाख कोटी रुपयांचा लाभ मिळणार आणि यामुळे विरोधकांचे विशेषतः आदित्य ठाकरे यांचे म्हणणे आहे, की महाराष्ट्राला काही मिळाले नाही ते असत्य आहे आणि विरोधक डोके शहामृगासारखे वाळूत खूपसून बसत आहेत असे दिसते. महाराष्ट्रावर टीका होत आहे. कारण महाराष्ट्र राष्ट्रीय खजिन्यात जास्तीत जास्त भर टाकतो आणि तरीही त्याकडे दुर्लक्ष केले जाते ही टीका सर्वथा गैरलागू आहे. शेतकऱ्यांना पुरेसा पाठिंबा नाही अशी टीका होते, पण अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी नारळ, काजू आणि इतर पीक उत्पादक शेतकऱ्यांसाठी बरेच काही आहे. शेतकऱ्यांसाठी काही नाही असे म्हटले तर मत्स्य तलाव, इतर पिकांसाठी अनुदान वगैरे तरतुदी आहे. हा अर्थसंकल्प पूर्ण महाराष्ट्रविरोधी आहे ही उबाठाच्या खासदाराने केलेली टीका ही अत्यंत चुकीची म्हणून विचारात न घेण्याजोगी आहे. विदर्भ आणि मराठवाड्याला अर्थसंकल्पात झुकते माप देण्यात आले नसले तरीही त्या भागाचा कायापालट व्हावा अशी हायस्पीड योजना दिली, पण सर्वात कहर म्हणजे एमएसएमई क्षेत्राला प्रचंड तरतूद करूनही विरोधक त्या क्षेत्राला काही नाही म्हणून बोंब ठोकत आहेत, ही बाब निश्चितच लांच्छनास्पद आहे. खरे तर हा अर्थसंकल्प विकसित भारताकडे पाऊल टाकणारा दमदार अर्थसंकल्प आहे असे फडणवीस म्हणाले. पण विरोधक म्हणतात ते खरे मानले तरीही या अर्थसंकल्पात १२ लाख कोटींची गुंतवणूक शेती, पशुपालन आणि मत्स्य शेती या क्षेत्रांत होणार आहे हे सत्य आहे. हे कसे नाकारता येईल. औद्योगिक सवलतींमुळे मराठवाडा आणि विदर्भ यांसारखे भाग विकासाच्या मार्गावर चालणार. ग्रोथ हबसाठी ५ हजार कोटी रुपये आणि प्रत्येक पाच वर्षांत ही योजना ही अत्यंत महत्त्वाची आहे. हा अर्थसंकल्प शेती आणि ग्रामीण विकासाला सर्वात महत्त्व देणारा आहे. जेथे ५९ टक्के ग्रामीण रोजगार आणि ४० टक्के सकल मूल्यवर्धित शेतीतून येते, तेथे कोणतेही सरकार शेतीकडे दुर्लक्ष करू शकणार नाही. देशांतर्गत आकडेवारीशिवाय महाराष्ट्राची आकडेवारीही अर्थसंकल्पात महाराष्ट्राला खूप काही देऊन गेली. काही अभ्यासकांचे आक्षेप बरोबर आहेत. एक म्हणजे शेतीसाठी त्यातल्या त्यात कमी तरतुदी आहेत आणि घर बांधणीसाठी फारसे काही मिळालेले नाही. करव्यवस्था जुनीच ठेवली. पण त्यापेक्षा महाराष्ट्राला काहीच मिळाले नाही हा आक्षेप बरोबर नाही. महाराष्ट्राला अर्थसंकल्पाने बरेच काही दिले.

# नकोशा होताहेत हव्याशा

पुरुष आणि महिला ही जीवनाच्या वाहनाची दोन चाके आहेत. एका वाहनाला सुरळीत चालण्यासाठी फक्त दोन चाकेच आवश्यक नसतात, तर समान गुणही आवश्यक असतात. त्याचप्रमाणे, सामाजिक जीवनाचे वाहन सुरळीत चालण्यासाठी, पुरुष आणि महिला दोघांमध्येही समान संख्या आणि गुण असणे आवश्यक आहे. दुर्दैवाने या वास्तवाची जाणीव अनेकांना नाही. अर्थात ही परिस्थितीही बदलत आहे. जगातील बहुतेक भागांनी मुला–मुलींमधील फरकाबद्दल शतकानुशतके रूढीवादी विचारसरणी सहन केली आहे; परंतु लोकांची विचारसरणी आता बदलत आहे, हे एक सुखद आणि दिलासादायक चित्र आहे. 'मुलगाच हवा' असा अट्टहास आता कमी होत आहे. मुलींनी सर्वच क्षेत्रांमध्ये आपल्या कर्तृत्त्वाची चुणूक दाखवल्यानंतर आता जग अशा टप्प्यावर आले आहे, जिथे ते मुलींकडे समान स्वारस्याने पाहते. 'गॅलप इंटरनॅशनल'ने अलीकडेच केलेल्या सर्वेक्षणात हे चित्र मांडले आहे. ४४ देशांमध्ये केलेले हे सर्वेक्षण वर्तमानाबद्दल समाधान आणि भविष्यासाठी आशा निर्माण करते. या देशांमध्ये, मुलाचे लिंग आता विचारात घेतले जात नाही आणि त्यांना मुलगा आहे, की मुलगी याचा कोणताही फरक पडत नाही. भारत, चीन, अमेरिका आणि अनेक युरोपीय देशांमधील पालक यात सहभागी आहेत. ही विचारसरणी आणि सुधारणा उपायांमुळे गेल्या २५ वर्षांमध्ये जागतिक स्तरावर ७० लाख मुलींचा मृत्यू रोखला गेला आहे. तथापि, या चित्राची दुसरी बाजू अशी आहे, की अजूनही दरवर्षी दहा लाखांहून अधिक मुलींना गर्भाशयातच मारले जात आहे. गेल्या ४५ वर्षांमध्ये गर्भाशयातच मारल्या जाणाऱ्या मुलींची संख्या पाच कोटींपेक्षा जास्त झाली आहे. यावरून दिसून येते, की लिंगभेदाचा कलंक कायमचा संपवण्यासाठी अजून बरेच काही करायचे आहे. हे भारतालाही लागू होते. विकसित देशांपेक्षा येथे आव्हाने आणि अडचणी जास्त आहेत. कमी शिक्षण, रूढीवादी पालकत्व, अंधश्रद्धा आणि गैरसमज येथे नेहमीच प्रचलित राहिले आहेत. अर्थात कालांतराने परिस्थिती सुधारते. असेच काही ताज्या राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाने दर्शवले आहे. ताज्या अभ्यासानुसार भारतात मुलींपेक्षा मुलेच हवीत, याबाबतची पसंती १९९९ मध्ये ३३ टक्क्यांवरून आता १५ टक्क्यांपर्यंत घसरली आहे. हे खूप उत्साहवर्धक लक्षण आहे; परंतु हे समजून घेतले पाहिजे, की १५ टक्के प्रमाणदेखील खूप जास्त आहे. त्याचा परिणाम देशातील प्रति एक हजार मुलांमागे ९४३ मुलींच्या लिंग गुणोत्तरात दिसून येतो. वैद्यकीय आणि वैज्ञानिक अभ्यास दर्शवतात, की जागतिक स्तरावर जन्मलेल्या मुलांचे मुलींच्या तुलनेतील प्रमाण १०५:१०० आहे. आज काही बाह्यशक्ती निसर्गाशी छेडछाड करत आहेत. या बाह्यशक्तीवर नियंत्रण ठेवले जात नाही, तोपर्यंत मुला–मुलींमधील हे असंतुलन दूर होणार नाही. ५७ ही एक महत्त्वाची तफावत आहे. सध्याच्या सुधारणेच्या गतीने ही तफावत भरून काढण्यासाठी पंचवीस वर्षांहून अधिक काळ लागेल. या मुली जगात प्रवेश करून आनंदी आणि समृद्ध जीवन जगतील याची खात्री करण्यासाठी त्यांचे संरक्षण वाढवणे आवश्यक आहे. विश्वाच्या संतुलनासाठीही हे आवश्यक आहे. दुर्दैवाने, भारतीय लोकसंख्येतील महिलांचे प्रमाण कमी झाले आहे. वेळोवेळी होणाऱ्या जनगणनेवरून हे स्पष्ट होते. एक किंवा दोन वगळता भारतातील प्रत्येक राज्यात महिलांच्या संख्येत घट दिसून येते.



यामुळे सामाजिक असमतोलाचा धोका निर्माण झाला आहे, जो कोणत्याही बाबतीत चांगला संकेत नाही. याकडे लक्ष न दिल्यास असमतोल वाढेल. गेल्या दशकांमध्ये केलेल्या जनगणनेचा आढावा घेतल्यास महिलांची संख्या आणि त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सातत्याने घट होत असल्याचे दिसून येते. हरियाणा आणि पंजाबसारख्या सुशिक्षित आणि समृद्ध राज्यांमध्ये महिलांची संख्या दर हजार पुरुषांमागे ८५० पेक्षा कमी झाली आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे, की राज्य जितके अधिक शिक्षित आणि समृद्ध असेल तितके महिला लोकसंख्या प्रमाण कमी असेल. केरळ हा अपवाद आहे. तथाकथित मागासलेल्या ईशान्येकडील राज्यांमध्ये महिलांचे प्रमाण अधिक समृद्ध राज्यांपेक्षा लक्षणीयरीत्या चांगले आहे. काही सुशिक्षित आणि समृद्ध राज्यांमध्ये विवाहयोग्य पुरुषांना महिला शोधण्यात बरीच अडचण येत आहे. या पुरुषांना आता अविवाहित राहण्याची समस्या भेडसावत आहे. यामुळे त्यांच्या पालकांना मुलांसाठी उपवर मुली शोधण्यासाठी इतर राज्यांकडे वळावे लागत आहे. ही एक सामाजिक समस्या आहे. ही समस्या काही बुद्धिजीवी, सामाजिक कार्यकर्ते आणि सरकारी अधिकाऱ्यांसाठी चिंतेचा विषय होती. तथापि, त्यांचे मुलगे अविवाहित राहतील आणि वंश नष्ट होईल, या भीतीने लोकांना या समस्येवर उपाय शोधण्यास भाग पाडले आहे. त्यांना त्याची कारणे विचारात घेण्यास भाग पाडले गेले आहे. प्राचीन काळापासून भारतीय समाजात मुलांना खूप महत्त्व दिले गेले आहे. पालकांचा विश्वास आहे, की मुलाने पिंडदान (अंतिम संस्कार) केल्याशिवाय त्यांना स्वर्ग मिळत नाही. महागाई कमी होती, तेव्हा लोक अनेक मुलांच्या संगोपन आणि शिक्षणाचा भार सहज पेलू शकत होते. तथापि, वाढत्या महागाईमुळे कुटुंबांना आपली मुले एक किंवा दोनपर्यंत मर्यादित ठेवावी लागली आहेत. लोक मुलगी नव्हे, तर मुलगा व्हावा यासाठी विविध युक्त्या वापरत आहेत. एके काळी भूतबाधा करणाऱ्या आणि जादूटोणा करणाऱ्यांची मदत घेणारे लोक आता गर्भाशयात लिंग निर्धारण चाचण्या करण्यासाठी वैज्ञानिक साधनांचा आधार घेत आहेत. पुरुषप्रधान समाजात महिलांना या घृणास्पद प्रथेमध्ये पुरुषांसोबत सामील होण्यास भाग पाडले जाते. महिला असूनही, त्या पुरुषांना स्त्रीभ्रूणहत्येमध्ये पाठिंबा देताना दिसतात. यामुळे जोडप्यांना स्त्रीभ्रूणहत्येपासून मुक्तता मिळू शकते; परंतु त्यांना या वाईट प्रथेच्या परिणामांची माहिती नसते. ते विसरतात, की पुढील काळात त्यांच्या मुलांना लग्न करण्यासाठी मुली उपलब्ध होणार नाहीत. या कृतीचा प्रतिकूल परिणाम म्हणजे सतत कमी होत जाणारी महिला लोकसंख्या. या समस्येचे आणखी एक प्रमुख कारण म्हणजे समाजाची पितृसत्ताक मानसिकता. ही मानसिकता मुला–मुलींच्या संगोपन, शिक्षण, वाढ आणि विकासाच्या संधींमध्ये दुहेरी मानके निर्माण करते. पालक अनेकदा मुलींच्या जन्मापासूनच त्यांचे संगोपन, काळजी आणि उपचार याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे त्यांच्या बाळांचा मृत्यू होतो किंवा त्यांचे आरोग्य बिघडते. मुलींचे शिक्षण आणि उच्च शिक्षण समाजात अनुकूलपणे पाहिले जात नाही आणि म्हणूनच त्यांना घराबाहेर पडण्याची परवानगी नाही. समाजात मुलींना ओझे मानले जाते. याचे कारण म्हणजे त्यांच्या लग्नाच्या वेळी हुंड्याची तरतूद. दुसरीकडे, मुलांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य दिले जाते. लहान वयात मुलींच्या आरोग्य आणि विकासाकडे लक्ष न दिल्यामुळे त्यांचा अकाली मृत्यू होतो. यामुळे लिंग असमतोल वाढतो. मुलींच्या अकाली मृत्यूचा परिणाम लगेच दिसून येत नाही. त्याचे परिणाम दहा ते बारा वर्षांनी दिसून येतात, जेव्हा त्याचे गंभीर स्वरूप समाज आणि सरकारसाठी चिंतेचा विषय बनते. बुद्धिजीवी आणि सरकारी यंत्रणा नंतर उपायांवर विचार करू लागतात. 'लाडली योजना', 'बेटी बचाओ–बेटी पढाओ' आणि 'कन्या विद्याधन' यासारख्या सरकारी योजना या दिशेने सरकारने उचललेले यशस्वी पाऊल आहे. याव्यतिरिक्त सरकार विविध माध्यमांद्वारे जनजागृती करण्याचा प्रयत्न करते. मुलीच्या जन्मासाठी पालकांना प्रोत्साहन देणे आणि मुलीच्या लग्नासाठी आर्थिक मदत करणे ही या दिशेने उचललेली ठोस पावले आहेत. सरकारने लिंग निर्धारण चाचण्यांना गुन्हेगार ठरवून आणि लिंग निर्धारण चाचण्या करणाऱ्या डॉक्टरांना शिक्षा करण्यासाठी कायदेशीर तरतुदी लागू करून प्रशंसनीय प्रयत्न केले आहेत. यामुळे लोकांची मानसिकता बदलली आहे. घटते पुरुष–स्त्री प्रमाण कमी करण्यासाठी सरकारी प्रयत्न लोकांपर्यंत पोहोचण्याची गरज आहे; विशेषतः मागास आणि दुर्गम भागात. सरकार हे त्याच्या प्रसिद्धीद्वारे करत आहे. खरे तर, लोकांची मानसिकता बदलण्याची गरज आहे, जेणेकरून ते मुला–मुलींना समान वागणूक देतील. मुलींच्या जन्माला ओझे न मानता या जगात प्रवेश करण्याची संधी दिली पाहिजे.आज समाजातील लोकांनी याचे दुष्परिणाम काही प्रमाणात ओळखले आहेत. समाजात महिलांची कमतरता, सुनेची कमतरता याची भीती, सामाजिक गुन्ह्यांमध्ये वाढ आणि बिघडत चाललेला सामाजिक असमतोल यामुळे लोकांच्या विचारसरणीमध्ये बदल झाला आहे. यामुळे मुलींच्या संख्येत काही सुधारणा झाली आहे; परंतु या दिशेने अजूनही बरीच सुधारणा आवश्यक आहे. समाजाने आज या दिशेने ठोस पावले उचलण्याची गरज आहे. अन्यथा, पुढील काही दशकांमध्ये कोणत्याही महिलेला द्रौपदी बनण्यास भाग पाडले जाईल. ही वेळ येण्याची वाट न पाहता, आपण जनजागरणाच्या दिशेने ठोस पावले उचलली पाहिजेत.

## पान १ वरून

### सिमेंटच्या गोणीतून...

टीमने छापा मारला. यावेळी शेतात दोन सिमेंटच्या गोणीत ११ किलो १५० ग्रॅम गांज्या पोलिसांना सापडला.या गांज्याची तस्करी होणार असतानाच पोलिसांनी गुमानसिंग शिवराम पावरा (वय–३५, रा. बोरमल्ली पाडा, ता. शिरपूर, जि.धुळे) व मनोज सीताराम मेहता (वय१९, रा.बाखरली, ता.वरला, जि.बडवानी राज्य. मध्यप्रदेश) या दोघांना रंगेहात पकडले आहे. नेकनूर ेलीस ठाण्यात दोन्ही आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आहेर हे करीत आहेत.

### मुख्यमंत्र्यांकडून हिरवा...

सक्षमपणे राबविण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. पालकमंत्री म्हणून स्व.अजितदादांच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील जनतेने आश्वासक विकासाचे स्वप्न पाहिले आहे. बीड जिल्ह्याच्या इतिहासात कर्तृत्ववान पालकमंत्री म्हणून दिवंगत दादांचा नक्कीच उल्लेख होणार आहे. त्यांच्या स्मृती बीडकरांसाठी सदैव प्रेरणादायी असल्यामुळे बीड नगर परिषद कार्यक्षेत्रात दिवंगत अजितदादा पवार यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी लागणारा निधी राज्यस्तरीय नियोजनातून विशेष बाब म्हणून उपलब्ध करावा, अशी मागणी या बैठकीत आ. विजयसिंह पंडित यांनी केली. मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी त्यास मान्यता दिली असून दिवंगत अजितदादा पवार यांच्या बीड शहरातील भव्य स्मारकास त्यांनी हिरवा कंदिल दाखविला आहे. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून दिवंगत अजितदादा पवार यांनी जोमाने विकास कामांना सुरुवात केली होती. त्यांच्या विकासाभिमुख भुमिकेमुळे बीड जिल्ह्यातील जनतेत त्यांचे जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले होते. त्यांच्या अकाली जाण्याने बीड जिल्ह्यातील जनतेने दुःख आणि संवेदना व्यक्त केल्या, बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेमध्ये स्व.अजित पवार यांच्या स्मृती कायम राहणार आहेत. भविष्यात त्यांचे विचार जिल्ह्यातील जनतेला प्रेरणादायी ठरणार असल्यामुळे त्यांचे स्मारक बीड शहरात होणे गरजेचे असून मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी या कामासाठी हिरवा कंदिल दाखविला असल्याची माहिती आ. विजयसिंह पंडित यांनी दिली आहे. आ. विजयसिंह पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त केले.

### ट्रॅक्टर पलटी...

तपासणीअंती मृत घोषित केले. या घटनेमुळे हिवरा (बु.) गावात शोककळा पसरली आहे. कुटुंबाचा आधार असलेल्या तरुणाच्या अचानक निधनामुळे गाडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटनेची नोंद ग्रामीण पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

### ऊसतोड कामगारांसाठी...

करून देण्यास सहमती दर्शविली होती. तसेच, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनीही या कामास मंजुरी देऊन मोठा निर्णय घेतला. बुधवार (दि.११) रोजी शासन निर्णयाव्दारे बीड जिल्ह्यातील ११ वसतीगृह बांधकामाच्या कामास शासनस्तरावरून तब्बल १५९.३६ कोटी रूपयांच्या भरघोस निधीसह मंजुरी देण्यात आली. त्यात बीड मतदारसंघासाठी बीड शहरात संत भगवानबाबा मुलींचे शासकीय वसतीगृह बांधकामाकरीता १४ कोटी ५६ लाख रूपयांचा निधी मंजुर करण्यात आला आहे. हा निर्णय केवळ वसतीगृह उभारणीपुरता मर्यादित नसून तो ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या उज्वल भविष्यसाठी घेतलेला ऐतिहासिक टप्पा आहे. गरीब, कष्टकरी ऊसतोड कामगारांच्या मुलांना त्यांच्या शिक्षणाचा हक्क आणि सुरक्षित निवासाची सुविधा मिळणार हि माझ्यासाठी खरी समाधानाची बाब असल्याचे आ.क्षीरसागर यांनी म्हटले आहे. त्यामुळे बीड मतदारसंघाचा प्रतिनिधी म्हणून मी स्व.अजित दादा पवार व महाराष्ट्र शासनाचे आभार मानत असल्याचेही त्यांनी सांगितले.

## राज्यातील ४ लाख ऊसतोड कामगारांना होणार गृहोपयोगी वस्तू संचांचे वाटप ;शासन निर्णय निर्गमित

# बीड जिल्ह्यात सर्वाधिक तब्बल २५ कोटींच्या भांड्यांचे होणार वितरण

**परळी** । प्रतिनिधी

सामाजिक न्याय मंत्री असताना धनंजय मुंडे यांनी प्रस्तावित केलेल्या ऊसतोड कामगारांच्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये या ऊसतोड कामगारांना गृह उपयोगी वस्तूंचे वाटप करण्याचे योजनेची वचनपूर्ती झाली आहे.राज्यातील ऊसतोड कामगार व त्यांचे कुटूंबियांना गळीत हंगामाच्या कालावधीमध्ये अनेक अडी–अडचणींचा सामना करावा लागत असल्याने ऊसतोड कामगारांना गृहोपयोगी वस्तू संच वाटप करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. गृहोपयोगी वस्तू संच वाटप करण्याबाबत गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये ४ लाख लाभार्थ्यांना गृहोपयोगी वस्तु संच वाटप करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय आज दिनांक १२ फेब्रुवारी रोजी निर्गमित करण्यात आला आहे या मध्ये सर्वाधिक लाभार्थी संख्या बीड जिल्ह्यात २५ हजार इतकी असून तब्बल २५ कोटी रुपयांच्या भांड्यांचे बीड जिल्ह्यात वितरण होणार आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये साखर उद्योग हा एक प्रमुख उद्योग असून सद्यः स्थितीमध्ये राज्यात कार्यरत सहकार व खाजगी क्षेत्रातील साखर कारखान्यांमध्ये उसतोड कामगार काम करतात. बहुतांश उसतोड कामगार हे राज्यातील विविध जिल्ह्यांत स्थलांतरीत होऊन काम करतात. या उसतोड कामगारांचे व पर्यायाने त्यांच्या कुटूंबियांचे जीवन अस्थिर व अत्यंत हलाखीचे असल्यामुळे त्यांचे जीवन सुखकारक करून त्यांचे राहणीमान उंचावून आयुष्य स्थिर व सुरक्षित करण्यासाठी ऊस तोडणी व्यवसायातील उसतोड कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ अन्वये गोपीनाथ मुंडे उसतोड कामगार कल्याण महामंडळ स्थापन करण्यात आले



आहे.ऊसतोड कामगार व त्यांचे कुटूंबिय दरवर्षी गळित हंगामाच्या कालावधीमध्ये ६ महिने किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी कारखाना कार्यक्षेत्रामध्ये रिकाम्या शेतामध्ये ऊसाच्या पाचटापासून तयार केलेल्या झोपड्यांमध्ये त्यांचे वास्तव्य असते. या कालावधीमध्ये त्यांच्या मूळ गावावरून फारच त्रोटक / अपुरे साहित्य घेऊन येत असतात. ऊसतोड कामगारांकडे पुरेसे गृहोपयोगी साहित्य (स्वयंपाकाची भांडी) यांची कमतरता असल्यामुळे ऊसतोड कामगारांना अनेक अडी–अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे राज्यातील ऊसतोड कामगारांना गृहोपयोगी वस्तू संच वितरीत करण्यासाठी गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता आजच्या शासन निर्णयातून देण्यात आली आहे.तथापि, प्रथम टप्प्यामध्ये १ लाख लाभार्थ्यांना व उर्वरित लाभार्थी संख्येनुसार टप्प्याटप्प्याने सदर गृहोपयोगी वस्तू संच वेळोवेळी शासन मान्यतेनुसारच वाटप करण्यात येईल.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com